Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
A Peer Reviewed Multidisciplinary Journal UGC Approved Journal No 48178, 48818
Impact Factor 5.18 ISSN 2278-5655

# डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी सुरु केलेल्या शैक्षणिक सोयी सुविधांचा अभ्यास

श्री.भोसले सचिन मच्छिंद्र
संशोधक

डॉ.बाविस्कर चंद्रकांत राघो
सहयोगी प्राध्यापक

शिक्षणशास्त्र संकुल ,स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ , नांदेड.

1 प्रस्तावना

शिक्षण आणि संस्कृती यांचे अभिन्न असं नात आहे.महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी त्याची सुरुवात केली आणि शाहु महाराज ,कर्मवीर भाऊराव पाटील ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,पदमश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांसारख्या नेत्यांनी तळागाळात शिक्षण नेले.हाच आदर्श डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी घेतला.सर्वसामान्य माणसाला जीवनाच्या विविध क्षेत्रातील शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी त्यांनी प्रवरानगर येथे शिक्षणाचे केंद्र स्थापन केले.वडिलांकडून आलेला स्त्री शिक्षणाचा वारसा त्यांनी जोपासला.देशभरातील मुर्लीना तंत्र आणि अन्य क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी संकुल उभारणे ही काळाची गरज मानली.

ग्रामीण भागातील शिक्षणाच्या दुराव्यवस्थेची डॉ.बाळासाहेब विखे पाटलांना कल्पना असल्याने जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ही परिस्थिती सुधारण्याचा त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न केला. अहमदनगर जिल्यातील आदिवासीबहुल अकोले तालुक्यासारख्या दुर्गम भागात बाहेरचे शिक्षक नोकरीस जाण्यास इच्छुक नसत .तेव्हा डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी 1962 ते 1967 या दरम्यान अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष असताना अकाले तालुक्यासारख्या दुर्गम भागात स्थानिक शिक्षकांची नेमणुक करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले .या धोरणामुळे दुर्गम भागातील शाळेच्या शिक्षकांचा प्रश्न मार्गी लागला. डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्या शैक्षणिक कार्याची सुरुवात ख-या अर्थाने या कार्यापासून झाल्याचे दिसुन येते.

आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना काढणारे डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांनी लोणी सारख्या छोटयाशा खेडयात प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक कार्य सुरु केले. त्यांच्या पश्चात डॉ.बाळासाहेब विखे पाटील हे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले. 1980 या वर्षी डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यापासून प्रवरानगर हे वैदयकिय, शेती, अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र आदींचे एक शैक्षणिक केंद्र म्हणून पुढे आले आहे. डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शिक्षणात येणा-या नवनवीन प्रवाहांचे उपयोजन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेते केले.जागतिक विचारांची

मिळतीजुळती योजना एका ग्रामीण विभागात कशी राबविता येईल याचा सखोल अभ्यास केला. आधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञान यांच्यावर आधारित शिक्षण देण्याचा प्रयत्न डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत केला .लोणी सारख्या खेडेगावात व्यावसायिक शिक्षण देऊन ग्रामीण भागातील तरुणांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न केला.शहरात विकास होतोच पण विकास प्रकल्प खेडयातही उभे राहु शकतात , आपण पुण्या मुंबईला जाण्याऐवजी भारतभराला खेडयात आणू हा डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचा विचार महात्मा गांधी यांच्या विचारांशी सुसंगत आहे.हया सर्वांबरोबरच डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत विविध घटकांना ज्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या त्यामुळे आज या परिसरात शिक्षणाचे केंद्रीकरण झालेले दिसते.

मुंबई विदयापिठाचे माजी कुलगुरु डॉ.विजय खोले हे डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांच्याबददल म्हणतात की, डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी राजकारणाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातही अतुलनिय ठसा उमटविताना ग्रामीण विदयापिठासारखी क्रांतीकारी संकल्पना प्रत्यक्षात उतरवून शिक्षण व विशेषतः ग्रामीण विदयापिठासारखी उच्च शिक्षणाला दिशादर्शक व उपयोजित स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. डॉ.भालचंद्र मुणगेकरांनी डॉ.बाळासाहेब विखे पाटलांचे लोकसभेतील शैक्षणिक कार्यावरील भाषण ऐकले होते, त्याबददल डॉ.मुणगेकर म्हणतात की , डॉ.बाळासाहेब विखे पाटीलांनी चालविलेल्या प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत राबविण्यात येणारी कमवा व शिका योजना गरजु विदयार्थ्यांसाठी आज अत्यंत अभिनव पध्दतीने व यशस्वीपणे सुरु आहे.डॉ.रावसाहेब कसबे यांच्या मते ,डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी सुरु केलेल्या शैक्षणिक संस्था हा एक स्वतंत्र अभ्यासाचा व चिंतनाचा विषय होऊ शकतो.फक्त लोणी परिसरातल्या त्यांनी उभ्या केलेल्या शैक्षणिक संस्था बघावयाच्या म्हटले तरी पूर्ण एक दिवस खर्च करावा लागतो.

1980 साली डॉ.विठठलराव विखे पाटलांचे निधन झाल्यानंतर त्यांनी उभारलेल्या सहकारी , शैक्षणिक संस्था सांभाळण्याची जबाबदारी डॉ.बाळासाहेब विखे पाटलांवर आली.या पार्श्वभूमीवर केवळ लोणी परिसरातील नव्हे तर देशपातळीवरील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पावले उचलण्यास डॉ.बाळासाहेब विखे पाटलांनी सुरुवात केली.डॉ.विठठलराव विखे पाटलांच्या काळात प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा विस्तार एक वरिष्ठ महाविदयालय ,एक प्राथमिक ,दोन माध्यमिक एवढयापुरता मर्यादित होता.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी 07 प्राथमिक शाळा ,36 माध्यमिक शाळा ,12 उच्च माध्यमिक विदयालये ,14 अतांत्रिक महाविदयालये ,10 तांत्रिक महाविदयालये अशाप्रकारे विस्तार केलेला दिसतो. या संख्यात्मक विस्ताराबरोबरच डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शिक्षणातील गुणात्मक वाढीसाठी विशेष प्रयत्न केले.यासाठी त्यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत विविध शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या त्या सुविधांची विस्तृत मांडणी खालीलप्रमाणे-

1. शिक्षकांसाठी निवासव्यवस्था

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत शिक्षक नेमताना डॉ.बाळासाहेब विखे पाटील त्यांची गुणवत्तेच्या आधारावर निवड करत.हे गुणवत्ताधारक शिक्षक त्यावेळी प्रवरा परिसरात सहजासहजी उपलब्ध होत नव्हती.इथली मुल शिकुन इथेच रोजगार शोधायची.गुणवत्ता म्हणजे काय याची कल्पना मुलांना नव्हती.यामुळे शहरातील लोक शिक्षक म्हणून इथे आणायचे .शहरातील लोक सहजासहजी येथे यायला तयार नसायची.बाहेरचे लोक इथे आले तरी त्यांच्या निवा-याची सोय नसायची.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांच्या खोल्या शिक्षकांना निवासस्थान म्हणून उपलब्ध करुन दिल्या.ब-याच दिवस शिक्षकांना त्या खोल्या उपलब्ध होत्या .फक्त प्रवरा शिक्षण संस्थचेच नव्हे तर तेथे रयत शिक्षण संस्थेचे लोकही राहत होते.त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचा बराचसा स्टाफ तिथे राहायचा.त्यांना अत्यंत चांगल्या खोल्या दिल्या जायच्या .मुबलक पाणी ,वीज तेथे पुरविले जायचे.प्रवरा शिक्षण संस्था असो वा रयत शिक्षण संस्था असु दया आपला परिसर साक्षर झाला पाहिजे हा उदात्त हेतु डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचा होता.

2. गुणवंत विदयार्थ्यांसाठी बक्षिस योजना

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचा असा विचार होता की , यशस्वी होणा-या विदयार्थ्यांना काही प्रोत्साहन मिळणे गरजेचे असते.कौतुकाची थाप पाठीवर पडली की ,मुलांना अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळते.या विचारातून प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत बक्षीस योजना सुरु झाली.शालांत ,उच्च माध्यमिक ,बोर्डाच्या परीक्षा, विषयातले प्रथम क्रमांक यासाठी बक्षीस दयायला सुरुवात झाली. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था , प.डॉ.वि.वि.पा.सहकारी साखर कारखाना ,गावातील दानशुर व्यक्ती यांनी ही प्रोत्साहनपर बक्षिसे दयायला सुरुवात केली.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचा असा विचार होता की ,गुणवत्ता ज्यांनी मिळविली आहे त्या विदयार्थ्यांचे कौतुक होणे गरजेचे आहे.नाही तर मुले नाराज होतील. कौतुकाचा एक शब्दही पुरेसा असतो.त्यासाठी वेगळे काही करावे लागत नाही.त्याला एक साध प्रशस्तीपत्रक जरी दिल.तरी त्याला स्फुरण चढत. प्रशिस्तपत्र लोकांना दाखवता येत आणि आपल्यात गुणवत्ता प्राप्त करण्यामध्ये शिक्षकाचे , महाविदयालयाचे मोठ योगदान आहे याची जाणीव विदयार्थ्यांना होते.या जाणिवेतून मुलांची अभ्यासाबाबतची तळमळ आणखी वाढते.जुजबी शिक्षण आता उपयोगाचे नाही.गुणवत्तापूर्ण शिक्षण असेल तरच विदयार्थ्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील . या विचारातूनच गुणवंत विदयार्थ्यांसाठी ही बक्षीस योजना सुरु झाली.

अभियांत्रिकी महाविदयालयातील काही निवडक बक्षिसांची यादी खालीलप्रमाणे-

1.बी.ई.मेकॅनिकल शाखेअंतर्गत महाविदयालयात प्रथम क्रमांक प्राप्त करणा-यास डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने सुवर्णपदक व पाच हजार रु.रोख बक्षिस.

2. जे.ई.ई. परीक्षेत महाविदयालयातील गुणानुक्रमे प्रथम तीन विदयार्थ्यांना अनुक्रमे रु.2000/- ,रु.1500/-, रु,1000/- बक्षिस.
3. प्रत्येक वर्गातून प्रथम येणा-या विदयार्थ्यांना 2000/- रुपये बक्षिस.
4. पदमभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील मेरीट स्कॉलरशिप ही 66 % पेक्षा जास्त गुण असणा-या विदयार्थ्यांना दिली जाते.

3. शिक्षकांसाठी पतसंस्था

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था सुरु झाल्याच्या कालखंडात शिक्षकांचे पगार त्यावेळेला लवकर होत नसायचे. शासनाकडुन त्यांचे पगार विलंबाने व्हायचे.बाहेरगावचे शिक्षक त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण व्हायचा.निवासव्यवस्था साखर कारखान्याने उपलब्ध करुन दिली .पण शिक्षकांना खर्चासाठी पैसे लागत होतेच.मग डॉ.बाळसाहेब विखे पाटील यांना असे वाटले की , आपण जस सहकाराच्या माध्यमातून सहकारी सोसायटया गावागावात काढल्या तशी शिक्षकांची एखादी पतसंस्था असावी.त्या माध्यमातून शिक्षकांना नाममात्र दरात कर्ज उपलब्ध करुन देता येईल आणि शासनाकडुन त्यांचे पगार झाले की ,त्याची परतफेड त्यांना करता येईल.विदयार्थ्यांना जसा खाण्या-पिण्याचा किंवा निवासाचा प्रश्न भेडसावत असायचा तसा शिक्षकांना पण भेडसावत असायचा.नोकरी मिळाली पण शासनाकडून वेळेवर पगार होत नाही. 2 ते 3 महिने पगार होत नाही.रोजी-रोटी ,चरितार्थ बाकीच्या गोष्टी असायच्या .या शिक्षकांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी एखादी शिक्षकांची पतसंस्था असावी असे डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांना वाटले.

4. विदयार्थ्यांना शिक्षणासाठी कर्जाची सुविधा.

उच्च शिक्षणासाठी मुलांकडे पुष्कळ गुणवत्ता आहे.पण आर्थिक परिस्थिती नाही.उच्च शिक्षणासाठी अधिक खर्च येतो.पालक तो खर्च करु शकत नाही.पालकांच्या सोयीने खर्च करायचा तर उच्च शिक्षण देणा-या संस्था यांना एकरकमी फी पाहिजे.मेस ,निवासव्यवस्था यासाठी जास्त खर्च यायचा.यामुळे उच्च शिक्षणापासून मुकण्याची वेळ त्यांच्यावर यायची.यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी परिसरातील वित्त पुरवठा करणा-या वित्तसंस्था ,राष्ट्रीयकृत बँका इथलया अधिका-यांची दरवर्षी मीटिंग घ्यायचे.विदयार्थ्यांना पण सांगायचे की ,ज्यांना आर्थिक पाठबळ नाही त्यांना आपण गरजु म्हणून पैसा उपलब्ध करुन देऊ.पण उच्च शिक्षणापासून कोणी वंचित राहता कामा नये.यासाठी त्यांनी बँकेच्या अधिका-यांना पटवून त्यांच्या ध्येयधोरणात बदल करायला सांगितला. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था या कर्जाच्या परतफेडीची हमी घ्यायची.डॉ.बाळासाहेब विखे पाटील बँकेच्या अधिका-यांना पटवून दयायचे की ,तुमच्या ध्येयधोरणात , पॉलिसीत बदल करा.नुसते शेती , घर ,ट्रॅक्टर ,उदयोग यासाठी कर्ज न देता शिक्षणासाठी पण कर्ज

दया.बँकेकडे फार मोठा निधी पडुन राहतो.या निधीचा उपयोग शिक्षणासाठी केला तर मुले शिकतील.शिकलेल्या मुलाकडून कर्जफेडीची जेवढी हमी देता येते तेवढी दुस-याकडून मिळत नाही.

2014-15 या वर्षात एकुण 212 विदयार्थी - विदयार्थिनींना एकुण 1,55,75,830/- रु (एक कोटी पच्चावन्न लाख पंच्याहत्तर हजार आठशे तीस रु.मात्र) इतके कर्ज मंजुर करण्यात आले.

नुसत्या कर्जाची सोय डॉ.बाळासाहेब विखे पाटलांनी केली नाही तर नोकरीला लागल्यानंतर त्या कर्जाची परतफेड करण्याची सोय केली.घेतलेल्या कर्जावर शिक्षण चालु असेपर्यंत त्या रकमेला व्याज नसायचे.एवढेच नव्हे तर कर्जफेडीसाठी काही विदयार्थ्यांना प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत नोक-या पण दिल्या.

5. कारखाना सभासदांच्या मुलांना फी मध्ये सवलत


प.डॉ.वि.विखे पाटील सहकारी साखर कारखाना सभासदांचे अठराविश्वे दारिद्रय ,शेती जास्त नाही.जरी परिसरात सहकारी साखर कारखाना सुरु झाला त्याच्या माध्यमातून पैसे मिळाले तरी त्या पैशातून कर्ज , लग्नकार्य , आजारपण यासाठीच जास्त खर्च व्हायचा. मुलांच्या शिक्षणासाठी प्रवेश घेताना सभासद डॉ.बाळासाहेब विखे पाटलांना म्हणायचे की ,साहेब आता प्रवेशासाठी पैसे नाहीत.यामुळे डॉ.बाळासाहेब विखे पाटलांना वाटले की, जर कारखाना उभारणीसाठी ,परिसर विकासासाठी यांच एवढं मोठ योगदान आहे तर त्याला कुठतरी आपण मदत केली पाहिजे.यातूनच डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प.डॉ.वि.विखे पाटील सहकारी साखर कारखाना सभासदांच्या मुलांना फी मध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला.सभासदांकडे पैसे नसतील तर उस पेमेंट ,दुध पेमेंट अशा पैशामधून त्यांची फी जमा करुन घ्यायची.कारण हे सर्व उभ करण्यात सभासदांच मोठ योगदान आहे.ज्यांनी हे उभ केल त्यांनाच जर पैशाअभावी शिक्षण घेता येत नसेल तर मग या सर्व सोयी-सुविधांचा काय उपयोग.

6. कमवा व शिका योजना


प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत गरीब मुलांनी प्रवेश घेतला होत.यासाठी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी कमवा व शिका योजना सुरु केली.केवळ पैशामुळे तुम्ही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये.त्यांना मेस , कारखाना, ग्रंथालय येथे काम दिल जायच.त्याच्या मोबदल्यात तासाप्रमाणे पैसे मिळायचे.त्या पैशातून मुलांच शिक्षण ,शिक्षणाचा खर्च ,निवास ,भोजन सर्व पूर्ण व्हायच.फार मोठी संधी डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी उपलब्ध करुन दिली.कमवा व शिका योजनेमुळे गोर-गरीबांची मुले ख-या अर्थाने उच्च शिक्षण घेऊ लागली.कामाच्या बदल्यात वेतन आणि त्या वेतनाचा उपयोग शिक्षणासाठी अशा पध्दतीने हा एक पथदर्शी, अभिनव प्रयोग झाला.याच्या माध्यमातून जिल्यातील ,जिल्हयाबाहेरील मुले शिक्षणासाठी या ठिकाणी प्रवेश घेऊ लागली.स्वतः कमावलेल्या पैशातून शिकण्याची संधी विदयार्थ्यांना येथे मिळाली.या योजनेतून माजी कुलगुरु एस.एन.पठाण यांच्यासारखे विदयार्थी घडले.

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांना कमवा व शिका योजनेत सहभागी विदयार्थ्यांबददल विशेष आस्था होती.या आस्थेपोटीच त्यांनी कमवा व शिका योजनेत सहभाग घेणा-या विदयार्थ्यांना दरवर्षी स्वनिधीतून अबदार कपडयांचे वाटप करण्याचा उपक्रम सुरु केला.या योजनेतून कमवा व शिका योजनेत सहभागी विदयार्थ्यांना दरवर्षी उबदार कपडयांचे वाटप करण्यात येते.या योजनेबददल डॉ.बाळासाहेब विखे पाटील म्हणतात की , þमवा व शिका योजनेत भाग घेणा-या विदयार्थ्यांना दरवर्षी आम्ही एक स्वेटर आणि एक ब्लँकेट देतो.गोरगरीब विदयार्थ्यांना त्याचा लाभ होतो.कमवा व शिका ही आमची ताकद आहे .या योजनेचा विस्तार आम्ही थांबविलेला नाही तर ,उलट तो कसा वाढेल असा आमचा प्रयत्न असतो.परिसरात अजुनही गरीबी आहेच , फी न देऊ शकणारे पालक आहेत .त्यांची मुले या योजनेत भाग घेऊन शिक्षणाचा खर्च भागवतात.प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रत्येक महाविदयालयात ही कमवा व शिका योजना प्राधान्याने राबविली जाते. त्याचबरोबर वैदयकीय , अभियांत्रिकी सारख्या व्यावसायिक महाविदयालयातही ही योजना राबविली जाते.हालाखीची आर्थिक परिस्थिती ही कोणाच्याही शिक्षण घेण्याच्या इच्छेचा अडसर ठरु नये यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करुन गरीब ,गरजू ,होतकरु विदयार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील करुन घेण्याचा हा प्रयत्न आहे.प्रायोगिक तत्त्वावर सुरु झालेली ही योजना आजमितीस माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरही सुरु आहे.

आलेख क्रमांक 1 - कमवा व शिका योजना विदयार्थी सहभाग



आलेख क्रमांक 2 - कमवा व शिका योजनेवर झालेला खर्च




7.वसतिगृह सुविधा

साधारणपणे 50 वर्षापूर्वी ग्रामीण भागातील मुले विशेषतः मुली सहज सुलभ पध्दतीने शालेय व उच्च शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे इच्छा असूनही शिक्षण घेऊ शकत नव्हत्या.शिक्षणाशिवाय ग्रामीण समाजाची प्रगती होणार नाही असे डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांचे ठाम मत होते.डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी शिक्षण प्रसाराबरोबरच ग्रामीण भागातील विशेषतः शेतकरी आणि शेतमजूर कुटूंबातील वाडया-वस्त्यांवर राहणारे मुले-मुली यांच्यासाठी सुरक्षित व अल्पदरामध्ये वसतिगृहाची सुविधा पुरविली.ख-या अर्थाने शिक्षणाचा प्रसार होईल या अर्थाने प्रवरा कन्या विदयामंदिर या वसतिगृहात्मक शाळेची स्थापना केली.प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने प्रत्येक नवीन सुरु केलेल्या शैक्षणिक संकुलात अग्रक्रमाने विदयार्थी व विदयार्थिनींच्या सुसज्ज निवास व्यवस्था पुरविण्यास अग्रक्रम दिला आहे.परिणामी वाडया वस्त्यावरती ,दुर्गम भागात किंवा दूरवरच्या जिल्हयामध्ये राहणारे अनेक विदयार्थी व विशेषतः विदयार्थिनी मोठया संख्येने वसतिगृहाचा लाभ घेत आहे.

2015-16 या वर्षात वसतिगृहाचा लाभ घेणारे विदयार्थी- विदयार्थिनी

| अन. | तपशील | 2015-16 |
|---|---|---|
| 1 | विदयार्थी | 2971 |
| 2 | विदयार्थिनी | 2756 |
| | एकूण | 5727 |

डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी वरीलप्रमाणे विविध स्वरुपाच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध केलेल्या दिसुन येतात.शिक्षण घेताना विदयार्थ्यांना वरील सुविधांपैकी कोणत्याही अडचणी येऊ नये म्हणून वरील सर्व सुविधा डॉ.बाळासाहेब विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत उपलब्ध करुन दिल्या आहेत.

संदर्भसूची

Best ,John & Kahn ,James (2009).*Research In Education* ,New Delhi :PHI Learning Private Limited.

खंडागळे ,जनार्दन काशिनाथ (2004).बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण नेतृत्व : एक अभ्यास ,पीएच.डी. मराठवाडा विदयापीठ ,औरंगाबाद.

गायकवाड ,राजेश (संपा.) (2007). *सहकार रत्न मा. खा.बाळासाहेब विखे पाटील गौरवग्रंथ* : लोणी.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था (2011).वार्षिक अहवाल ,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था :2010-2011.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था (2015*).वार्षिक अहवाल ,प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था :*2014-2015.

विखे पाटील ,बाळासाहेब (2007).*कोठे राहिला गाव*(अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब (2004). *अर्थ - अनर्थ* (अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब (2004)*.प्रवरेच्या तीरावरुन*(अप्रकाशित) ,प्रवरानगर : प्रवरा अभ्यास मंडळ.

विखे पाटील ,बाळासाहेब ,(1995, ऑगस्ट) ा*शिक्षण आणि ग्रामीण रोजगार* .लोकसत्ता.